आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० एप्रिल २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन/ राज्यपाल, मुख्यमंत्र्यांनी दिल्या शुभेच्छा

- २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यातला आरोपी तहव्वूर राणा याचं भारतात प्रत्यार्पण

- राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती

**आणि**

- अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे होणाऱ्या २०२८च्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होणार

**<><><><><>**

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीर यांनी अहिंसा परमो धर्माच्या संदेशाद्वारे मानवतेला एक नवीन मार्ग दाखवला असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीरांची शिकवणी आपल्याला एका करुणामय आणि सुसंवादी जगाकडे घेऊन जातात असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. भगवान महावीराचे आदर्श जगभरातल्या असंख्य लोकांना बळ देतात, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी जनतेला महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस तीर्थंकर भगवान महावीरांचं जीवन

कार्य तसंच त्यांच्या अनेकांतवादाच्या शिकवणीचं स्मरण करून देतो, असं राज्यपालांनी म्हटलं आहे. भगवान महावीर यांची अहिंसा, सत्य आणि करुणेची शिकवण आपल्याला सतत मार्गदर्शन करते असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. भगवान महावीरांचे मानवकल्याणाचे विचार आचरणात आणण्याचा सर्वांनी प्रयत्न करुया, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. भगवान महावीर यांनी आपल्याला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

महावीर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**छत्रपती संभाजीनगर** इथं जैन समाजाच्या वतीने पैठण गेट परिसरातून गुलमंडीमार्गे मिरवणूक काढण्यात आली. शहरातल्या अनेक जैन मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**अकोला** शहरात जैन समाजाच्या वतीनं प्राचीन जैन मंदिरापासून शोभायात्रा काढण्यात आली.

**नागपूर** इथं जैन समाजाच्या वतीनं भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

**धुळे** शहरात भगवान महावीर जयंती निमित्त आज सकाळी सकल जैन समाजाच्या वतीनं वरघोडा मिरवणूक काढण्यात आली. आज दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे.

**नांदेड**मध्ये भगवान महावीर जयंतीनिमित्त शहरातून भव्य शोभायात्राही काढण्यात आली. **सांगली** शहरात महावीर जयंतीनिमित्त शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी रक्तदान शिबिर आणि निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं.

भगवान महावीर यांचं जन्मस्थान असलेल्या बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातल्या कुंडलपूरमध्ये शोभायात्रा, मस्तकाभिषेक आणि इतर धार्मिक

कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. नालंदा इथंही पावापुरी मधल्या जैन मंदीरात जैन भाविक मोठ्या संख्येनं पूजाअर्चा करत आहेत.

**<><><><>**

देशाची चालू आर्थिक वर्षातली वस्तू आणि सेवा क्षेत्रातली निर्यात ८२० अब्ज डॉलरवर गेली आहे. ही निर्यात गेल्या वर्षीच्या याच कालावधीतल्या ७७८ अब्ज डॉलरपेक्षा ६ टक्के अधिक असल्याचं वाणिज्य मंत्रालयानं सांगितलं. वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत झालेल्या निर्यात प्रोत्साहन परिषद आणि उद्योजकाच्या बैठकीत ही आकडेवारी समोर आली आहे.

**<><><><>**

नवी दिल्लीत आज पासून ९ वे जागतिक तंत्रज्ञान संमेलन सुरु होत आहे. ४० देशातले दीडशेहून अधिक वक्ते या संमेलनात सहभागी होत आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात एकूण ४० सत्रे होणार आहेत. या वर्षीच्या संमेलनाचा विषय संभावना अर्थात शक्यता असा असून यामध्ये तांत्रिक आव्हाने आणि संधींवर चर्चा होणार आहे. या संमेलनात मुख्य भाषण, मंत्रीस्तरीय चर्चा, तज्ञ समिती स्तरीय आणि राजकीय स्तरावरील चर्चा होणार आहे.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या आणि परवा म्हणजे ११ आणि १२ एप्रिलला महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. उद्या संध्याकाळी आठ वाजता त्यांचं पुण्यात आगमन होईल. परवा सकाळी रायगड जिल्ह्यात पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचं ते दर्शन घेतील. त्यानंतर रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीचं दर्शन घेतील आणि रायगडावर आयोजित कार्यक्रमात सहभागी होतील. त्याच दिवशी संध्याकाळी साडे पाच वाजता मुंबईत गुजराती साप्ताहिक पत्रिका चित्रलेखाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याचं भारताकडे प्रत्यार्पण झालं. राष्ट्रीय तपास संस्थेचं पथक थोड्याच वेळात त्याला घेऊन नवी दिल्लीत पोहोचेलं आहे. राणा याचं प्रत्यार्पण हे केंद्र सरकारच्या राजनैतिक प्रयत्नांचं मोठं यश असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री अमित शहा आणि पीयूष गोयल यांनी दिली आहे.

दरम्यान याप्रकरणी सरकारची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी केंद्र सरकारनं नरेंदर मान यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली आहे.

<><><><><>

राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते एसटी महामंडळाचे २६ वे अध्यक्ष आहेत. एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करून प्रवाशांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचं सरनाईक यांनी यावेळी सांगितलं.

पालघरमध्ये लवकरच नवं प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात येईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर केली आहे. पालघर विभागातल्या ८ आगारांना प्रत्येकी ५ नवीन एसटी बस देण्यात येत असल्याची घोषणाही यावेळी त्यांनी केली.

<><><><><>

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे होणाऱ्या २०२८च्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होणार आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी मंडळानं काल याची घोषणा केली. ऑलिंपिकमध्ये २० षटकांचे सामने होणार असून त्यात पुरुष आणि महिलांच्या स्पर्धेत प्रत्येकी सहा संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघ प्रत्येकी १५ खेळाडू खेळवू शकणार आहे. मात्र, अद्याप यासाठी स्टेडियमच्या नावांची यादी ठरवण्यात आलेली नाही.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात बेंगळुरुच्या एम. चिन्नास्वामी स्टेडिअमवर सामना होणार आहे. सामन्याला संध्याकाळी साडेसात वाजता सुरुवात होईल. दिल्ली कॅपिटल्स सलग तीन सामने जिंकत सहा गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु चौथ्या स्थानी आहे.

<><><><>

चीनमध्ये निंगबो इथं सुरु असलेल्या आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताची मिश्र जोडी ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी चीनी तैपेईच्या हाँग वेई ये आणि निकोल गोंझालेस चान यांचा १२-२१, २१-१६, २१-१८ असा पराभव केला. तसंच आशिथ सूर्या आणि अमृता प्रमुथेश या जोडीचा उपउपांत्यपूर्व फेरीत पराभव झाला.

महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत पी.व्ही. सिंधूला जपानच्या अकाने यामागुची कडून ११-२१, २१-१६, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत भारताच्या किरण जॉर्जला देखील थायलंडच्या कुनलावुत विटिडसारनकडून २१-१९, १३-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला.

<><><><>

तिरंदाजी विश्वचषक स्पर्धा २०२५ च्या पहिल्या टप्प्यात पुरुषांच्या संयुक्त सांघिक क्रीडाप्रकारात भारतानं कांस्य पदक पटकावलं आणि  भारताच्या खात्यात पहिलं पदक जमा झालं. अभिषेक वर्मा, ऋषभ यादव आणि ओजस देवताळे यांच्या संघानं काल अमेरिकेतल्या ऑबर्नडेल इथं झालेल्या कांस्यपदकाच्या सामन्यात डेन्मार्कचा २३०-२२३ असा पराभव केला. भारतीय त्रिकुटानं उपांत्यपूर्व फेरीमध्ये

ग्वाटेमालाचा २२०-२१८ असा पराभव केला होता, परंतु उपांत्य फेरीत इटलीकडून त्यांना थोड्या फरकानं पराभव पत्करावा लागला.

<><><><><>

टेनिसमध्ये, रोहन बोपण्णा आणि बेन शेल्टन यांनी मोंटे-कार्लो मास्टर्स स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या इंडो-अमेरिकन जोडीनं तिसऱ्या मानांकित इटालियन जोडी सिमोन बोलेली आणि आंद्रिया वावसोरी यांना एका रोमांचक सामन्यात २-६, ७-६, १०-७ असं पराभूत केलं. बोपण्णानं पाब्लो क्यूवास याच्यासोबत २०१७ मध्ये मोंटे-कार्लो मास्टर्स किताब जिंकला होता. पुरुषांच्या एकेरीत, चिलीच्या अलेजांद्रो ताबिलोनं दुसऱ्या फेरीत २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता नोवाक जोकोविचचा ६-३, ६-४ असा पराभव केला.

<><><><><>

भारतीय हॉकी महिला संघ २६ एप्रिल ते ४ मे या कालावधीत पाच सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्याच्या सुरुवातीला म्हणजे २६ आणि २७ एप्रिल रोजी भारतीय संघाचा सामना ऑस्ट्रेलियाच्या अ संघाबरोबर होईल.

//<><><><><>//